# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१, २६०५१११० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१०/अ व ब वर्ग/संस्था नि./२०१५/८१०
दिनांक २३/०१/२०१५

**वाचावे :** इकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/निवडणूक प्रक्रिया घोषणा/६३०/२०१५ दि.२०/१/२०१५

**विषय :** 'अ' व 'ब' वर्ग संस्था प्रकारातील सहकारी संस्थांच्या निवडणूका – प्रती उपलब्ध करुन देणेबाबत...

परिपत्रक

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब अन्वये, राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी " राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर " सोपविण्यात आलेली आहे. निवडणूक प्रयोजनार्थ महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये संस्थांची वर्गवारी दर्शविण्यात आलेली असून, प्राधिकरणाने 'अ' व 'ब' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणेसाठी आवश्यक आदेश/ परिपत्रके/ मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच उक्त वाचावेनूसार सदर वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीची प्रक्रिया सुरु करणेचे आदेश यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत.

त्यानूसार 'अ' व 'ब' वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया चालु झालेली असुन, संबंधीत घटकांकडून निवडणूकसंबंधाने खालील प्रतिंची मागणी होत असल्याचे दिसून येत आहे. सदरच्या प्रती मागणीनूसार उपलब्ध करुन देण्याचेदृष्टीने अशा संस्थांच्या निवडणूकीसंबंधात जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी खाली नमूद केलेल्या बाबींच्या पुरेशा प्रती निवडणूक निर्णय अधिकारी/ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे ठेवाव्यात. तसेच आवश्यकतेप्रमाणे संबंधीतांनी मागणी केल्यास त्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदर प्रती केवळ तपासणीसाठी नि:शुल्क पुरविण्यात याव्यात. तथापी, प्रतींची मागणी केल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीप्रमाणे आवश्यक शुल्क आकारुन देण्यात याव्यात.

१. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ ची प्रत
२. संस्थेचे उपविधी प्रत (संस्थेकडून मागवून घ्याव्यात)
३. अंतिम मतदार यादी प्रत

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांचे आदेशाने.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव :** तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)